# वसई-विरार शहर महानगरपालिका
## वैद्यकीय आरोग्य विभाग

दि.१५/०५/२०२४

**<u>महानगरपालिका वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत रॅलीद्वारे मतदान जनजागृती</u>**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने मतदान करणे बाबत मतदारांमध्ये जनजागृती करणेकरिता मा.आयुक्त श्री.अनिलकुमार पवार यांच्या निर्देशानुसार तसेच मा.अतिरिक्त आयुक्त श्री.संजय हेरवाडे व मा.उप-आयुक्त श्री.समीर भूमकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्वीप ॲक्टीविटी (SVEEP ACTIVITY) अंतर्गत वसई विरार शहर महानगरपालिका वैद्यकीय आरोग्य विभागाच्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र रानळे तलाव, ना.प्रा.आ.केंद्र बोळींज, ना.प्रा.आ.केंद्र निदान, ना.प्रा.आ.केंद्र नारिंगी, ना.प्रा.आ.केंद्र चंदनसार येथील आरोग्य कर्मचाऱ्यांमार्फत दि.१३ मे २०२४ रोजी बोळींज सामान्य रुग्णालय, विरार (प.) येथून मतदान जनजागृती रॅली काढण्यात आली.

त्याचप्रमाणे विजयनगर तुळींज रुग्णालय, माता बाल संगोपन केंद्र, सर्वोदय वसाहत रुग्णालय, सोपारा सामान्य रुग्णालय, ना.प्रा.आ.केंद्र आंबेडकर नगर, पेल्हार, बिलालपाडा, मोरेगाव या सर्व आरोग्य केंद्रांच्या अधिकारी व कर्मचारी यांनी मतदारांनी जास्तीत जास्त मतदान करणेकरिता जनजागृती करण्यासाठी तुळींज रुग्णालय येथून रॅली काढण्यात आली.

सदर रॅलीत प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ.भक्ती चौधरी, उप-वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.अनिरुद्ध भेले, प्र.वैद्यकीय अधीक्षक डॉ.कविता जगदा, प्र.वैद्यकीय अधीक्षक डॉ.राणी बदलानी, इतर वैद्यकीय अधिकारी व आरोग्य कर्मचारी सहभागी झाले होते. सदर जनजागृती रॅलीच्या माध्यमातून युवक वर्गाने आणि सर्व मतदारांनी जागरूकतेने आणि जास्तीत जास्त संख्येने मतदान करून लोकशाही बळकट करावी असे आवाहन करण्यात आले.

**वैद्यकीय आरोग्य विभाग**
**वसई विरार शहर महानगरपालिका**